केंद्र / राज्य पुरस्कृत सुरक्षित शहर प्रकल्पांतर्गत मुंबई शहरासाठी महिला सुरक्षितता पुढाकार योजनेची अंमलबजावणी व देखरेख ठेवण्याकरीता राज्यस्तरीय उच्चतम समिती गठीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पीएडब्ल्यू- १११७ /प्र.क्र.७१९/विशा-६**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ०८/०३/२०१९

<u>वाचा</u>- १) शासन निर्णय,गृह विभाग, क्रमांक : पीएडब्ल्यू- १११७ /प्र.क्र.७१९/विशा-६, दि.३१/०१/२०१९
२) पोलीस आयुक्त, मुंबई कार्यालयाचे पत्र क्र. ओ. एडब्ल्यू.नं.४२/सी.पी./ॲडिशनल सी.पी./क्राईम/२०१९, दि. ०६/०२/२०१९
३) गृह विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. २/२/२०१८-NERS(WS-II), दि. २८/०९/२०१८ (मार्गदर्शक सूचना)

**<u>प्रस्तावना:-</u>**

सार्वजनिक ठिकाणी महिलांवर होणा-या अत्याचाराच्या घटनांवर परिणामकरीत्या आळा घालण्याच्या दृष्टीने व त्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी केंद्र शासनाच्या गृह तसेच महिला व बाल कल्याण मंत्रालयाने सुरक्षित शहर प्रकल्पांतर्गत महिला सुरक्षितता पुढाकार योजना राबविण्यासंदर्भात देशातील मुंबई शहराची निवड करून सदर योजना राबविण्यास मान्यता दिलेली आहे. सदर योजना सन २०१८-१९ ते सन २०२०-२१ या तीन वर्षात राबविण्यात येणार असुन योजनेमध्ये केंद्र/ राज्य हिस्सा ६०:४० या प्रमाणात आहे. प्रस्तुत योजनेसाठी केंद्र शासनाने रु.२५२.००कोटी इतक्या निधीस मान्यता प्रदान केली आहे. यानुसार सुरक्षित शहर प्रकल्प अंतर्गत मुंबई शहरासाठी मंजूर निधीच्या अनुषंगाने मंजूर केलेल्या रु. २५२.०० कोटीपैकी ६० % प्रमाणे केंद्र हिस्सा १५१.२० कोटी व ४०% प्रमाणे राज्य शासनाचा हिस्सा रु. १००.८० कोटी इतका असणार आहे. केंद्र शासनाने देशातील निवडक आठ शहरांसाठी सुरक्षित शहर प्रकल्प अंतर्गत दिलेल्या मान्यतेनुसार मुंबई शहरासाठी महिला सुरक्षितता पुढाकार योजनेतील शिर्षनिहाय खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

(रू. कोटीत)

| अ.क्र.<br>Sr.No. | शिर्षनिहाय<br>Heads | तपशिल<br>Particulars | रक्कम<br>Amount | टक्केवारी<br>Percentage |
|---|---|---|---|---|
| १. | तंत्रज्ञान विषयक<br>Technology | देखरेख , दृश्य स्वरूपातील संवेदनशील ठिकाण, मागोवा व निराकरण , सामाजिक प्रसार माध्यमांचा दुरूपयोग करणा-यांचा शोध घेणे / सायबर न्यायवैद्यक व मोबाईल डाटा टर्मिनल्स विकसित करणे.<br>Surveillance, SOS Hotspot, Track-me Solution, Social Media Abuse Tracking / Cyber Forensics, Mobile Data Terminals | १८०.०० | ७१.३९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | क्षमता विकास<br>Capacity Building | अधिकारी प्रशिक्षण<br>Training of Officers | २०.०० | ७.९३ |
| ३. | प्रसिध्दी / जागरूकता<br>Awareness | पोलीस दिदी, सामाजिक आणि मुद्रीत माध्यमे, कार्यक्रम<br>Police Didi, Social & Print Media, Events | २२.०० | ८.७२ |
| ४. | Outreach | मदत व पुनर्विलोकन कक्ष, गस्त आणि प्रतिसाद, वाहने, सामाजिक सर्वेक्षण<br>Helpline & Review Desk , Patrol & Response Vehicles, Social Survey | २३.०० | ९.१२ |
| ५. | संकीर्ण<br>Miscellaneous | प्रकल्प व्यवस्थापन खर्च , तृतीय पक्ष लेखापरीक्षण<br>Project Management Cost, ३rd Party audit | ७.१५ | २.८४ |

गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी संदर्भीय क्र. ३ अन्वये निर्गमिते केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे अवलोकन करता मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजने ची अंमलबजावणी व देखरेख ठेवण्याकरीता मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उच्चतम समितीची रचना गठीत करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने सदरहू समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होत.

**<u>शासन निर्णयः</u>-**

१. मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजने ची अंमलबजावणी व देखरेख ठेवण्याकरीता मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उच्चतम समितीची रचना खालीलप्रमाणे गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव ( गृह ) / प्रधान सचिव (विशेष) , गृह विभाग | सदस्य |
| ३ | आयुक्त / अतिरिक्त पोलीस आयुक्त, मुंबई | सदस्य |
| ४ | आयुक्त / अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| ५ | सचिव (माहिती तंत्रज्ञान), सा.प्र.विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ६ | गृह मंत्रालय आणि महिला व बाल विकास विभाग, भारत सरकार यांचे प्रतिनिधी | निमंत्रित सदस्य |

२. सदर समितीची बैठक महिन्यातून एकदा आयोजित करण्यात यावी. तसेच सदर बैठकीचे इतिवृत्त गृह मंत्रालय आणि महिला व बाल विकास विभाग, भारत सरकार यांना सादर करण्यात यावे.

३. सदर योजनेकरीता निविदा प्रस्तुत करणे व स्विकृती ही बाब सदर समिताच्या कार्य कक्षे अंतर्गत राहील. तसेच सदर समितामार्फत या योजनेच्या कामाचा वेळोवेळी आढावा घेण्यात येईल.

४. हा शासन निर्णय दिनांक २२/०१/२०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सदर योजनेस दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०३१११७२०४१२८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kathawate Ganesh Mohan

Digitally signed by Kathawate Ganesh Mohan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ddf28fd1f8f29ff8697fe818d6972a7b4a8f1571332ccbea3052a34fcfc7f539, serialNumber=9f40ba5d0001001e5d7fb08f1f09fa7254742312881f9048102f68cd0ed7649f, cn=Kathawate Ganesh Mohan
Date: 2019.03.11 17:25:28 +05'30'

**( गणेश काथवटे )**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा / विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन,मुंबई
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे प्रधान सचिव
५) सचिव (माहिती तंत्रज्ञान), सा.प्र.विभाग, मंत्रालय, मुंबई
६) मा.राज्यमंत्री (गृह/ शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा.राज्यमंत्री (गृह/ ग्रामीण), वित्त व नियोजन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
९) पोलीस आयुक्त, मुंबई.
१०) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका
११) संचालक ( महिला सुरक्षा ), महिला व बाल विकास विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली
१२) उप सचिव, गृह विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली
१३) अधिदान व लेखाधिकारी/निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४) वित्त विभाग (का.व्यय-७),मंत्रालय,मुंबई.
१५) निवड नस्ती (विशा-६) कार्यासन ,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.